दैनिक
# चकमक
संपादक : शामसुंदर चितोडा
कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले * अंक : २० * जालना * * शुक्रवार २१ ऑगस्ट २०२६ * * पाने : ४ * *किंमत : २ रूपये *

## न्या. यशवंत वर्मा यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी

नवी दिल्ली : न्यायिक उत्तरदायित्व आणि सुधारणांसाठी अभियान (सीजेएआर) यांनी अलाहाबाद हायकोर्टाचे माजी न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करून चौकशी सुरू करण्याची मागणी केली आहे. लोकसभेच्या चौकशी समितीच्या अहवालानंतर ही मागणी करण्यात आली आहे. या अहवालात सरकारी निवासस्थानी लागलेल्या आगीच्या घटनेदरम्यान सापडलेल्या बेहिशेबी रोकडप्रकरणी न्यायमूर्ती वर्मा यांच्यावरील तिन्ही आरोप सिद्ध झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. न्यायमूर्ती वर्मा यांनी एप्रिल २०२६ मध्ये राजीनामा दिला होता. मात्र, त्यांच्या राजीनाम्यानंतरही या प्रकरणाची चौकशी आणि उत्तरदायित्वाची प्रक्रिया थांबू नये, असे सीजेएआरचे म्हणणे आहे. चौकशी समितीचा अहवाल सभागृहात मांडण्याच्या



निर्णयाचेही संघटनेने समर्थन केले आहे. सीजेएआरनुसार, चौकशी समितीचा अहवाल सार्वजनिक प्रक्रियेत पुढे नेणे हे न्यायव्यवस्थेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. न्यायमूर्ती पी. डी. दिनाकरन यांच्या राजीनाम्यानंतर त्यांच्याविरोधातील महाभियोगाची प्रक्रिया थांबली होती. अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, असेही संघटनेने म्हटले आहे. संघटनेच्या मते, न्यायमूर्ती वर्मा यांच्या राजीनाम्यानंतर आणि चौकशी समितीच्या निष्कर्षांनंतर त्यांना मिळणारे न्यायिक संरक्षण आता प्रभावी राहिलेले नाही. त्यामुळे त्यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यासाठी भारताच्या सरन्यायमूर्तींची परवानगी आवश्यक नाही, असा दावा सीजेएआरने केला आहे. सीजेएआरने सरन्यायमूर्तींकडे मागणी केली आहे की, न्यायमूर्ती वर्मा यांच्या सरकारी निवासस्थानी सापडलेल्या बेहिशेबी रोकडप्रकरणी दिल्ली पोलिसांना एफआयआर दाखल करून चौकशी करण्याचे निर्देश द्यावेत. चौकशी समिती तसेच न्यायव्यवस्थेच्या अंतर्गत प्रक्रियेत स्थापन करण्यात आलेल्या तीन सदस्यीय समितीचा अहवाल असूनही तपास यंत्रणांनी अद्याप एफआयआर दाखल केलेली नाही, असे संघटनेने म्हटले आहे. चौकशी समितीने आरोप सिद्ध झाल्याचे मानले असले तरी ही बाब केवळ न्यायमूर्तींना पदावरून हटविण्याच्या प्रक्रियेपुरती मर्यादित राहू नये, असे सीजेएआरचे म्हणणे आहे. या निष्कर्षांच्या आधारे संभाव्य फौजदारी कारवाईचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. एफआयआर दाखल केल्यानंतर या तपासावर सर्वोच्च न्यायालयाच्या पातळीवर देखरेख ठेवण्यात यावी, अशीही मागणी सीजेएआरने केली आहे. यामुळे न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास अधिक मजबूत होण्यास मदत होईल, असे संघटनेचे (पान ३ वर)

## गावठी पिस्तूल, रिव्हॉल्व्हर व तलवारी जप्त; तीन आरोपी जेरबंद
### जालना पोलिसांची कारवाई ; ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

जालना । प्रतिनिधी : जालना जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू केला असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तीन वेगवेगळ्या कारवायांमध्ये तीन आरोपींना जेरबंद केले आहे. या कारवाईत एक गावठी पिस्तूल, एक देशी रिव्हॉल्व्हर तसेच दोन धारदार व तीक्ष्ण तलवारी असा एकूण ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमांचा शोध घेऊन कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक श्री. तोगबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही कारवाई केली.

पहिल्या कारवाईत खऱ्पुडी परिसरातील प्रथमेश बालाजी कदम (वय १९) याच्याकडून एक गावठी पिस्तूल जप्त करण्यात आले. या पिस्तुलाची किंमत सुमारे ३५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. याप्रकरणी तालुका पोलीस ठाणे, जालना येथे संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत मधुबन कॉलनी, जालना येथील राजेश दिपक पांजगे (वय २४) याच्याकडून एक देशी रिव्हॉल्व्हर जप्त करण्यात आला. या शस्त्राची अंदाजे किंमत २० हजार रुपये आहे. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



तिसऱ्या कारवाईत खिस्ती कॅम्प, जालना येथील पवन बबन कसबे (वय २३) याच्याकडून दोन धारदार व तीक्ष्ण तलवारी जप्त करण्यात आल्या. जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे ३ हजार रुपये आहे. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या तिन्ही कारवायांमध्ये एकूण ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पोलिसांची कारवाई सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदारांनी केली.

## महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम

राज्यात पावसाचा जोर अजूनही कायम आहे. हवामान विभागाने दिलेल्या नव्या अंदाजानुसार आगामी तीन दिवस महाराष्ट्रातील विविध विभागांमध्ये पावसाची वेगवेगळी रूपे पाहायला मिळणार आहेत. विशेषतः कोकण आणि गोवा पट्ट्यात पावसाचा प्रभाव अधिक राहण्याची शक्यता वर्तवली आहे. २१ ऑगस्टचा हवामान अंदाज कोकण–गोवा जिल्ह्यांमध्ये बहुतांश ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस / वादळी पावसाची दाट शक्यता आहे, मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये आणि मराठवाड्यातील तुरळक ठिकाणी हलका पाऊस / वादळी पावसाची दाट शक्यता आहे. २१ ऑगस्ट रोजी मुंबईतील हवामान कसे असणार? मुंबई शहर आणि उपनगरात अधूनमधून हलक्या पावसासह आकाश अंशत: ढगाळ राहील. कमाल आणि किमान तापमान अनुक्रमे ३१ अंश सेल्सिअस आणि २७ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. हवामान खात्याचा एकंदर अंदाज... २१ ऑगस्टचा विभागवार हवामान अंदाज कोकण – बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता. मध्य महाराष्ट्र – काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता. मराठवाडा – काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता. विदर्भ – काही ठिकाणी पाऊस पडण्याची (पान ३ वर)

## सिंगोना येथील शासकीय पाणी पुरवठा विहिरीचा पंचनामा ; मनसेच्या आंदोलनाची प्रशासनाकडून दखल, पावसाळ्यातील ७४ दिवस उलटून गेले
### पाऊस नाही पाच दिवसात पाणी नाही मिळाले तर उपविभागीय अधिकारी परतुर यांची गावातील प्रत्येक माणूस भेट घेणार : जिल्हाध्यक्ष सोळंके

परतूर/प्रतिनिधी : सिंगोना येथील दलित वस्ती योजनेअंतर्गत गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी सन २००२–०३ च्या कालावधीत बांधण्यात आलेल्या मूळ शासकीय विहिरीचा अखेर आज दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करण्यात आला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने या विहिरीचा तातडीने ग्रामपंचायतीच्या ताब्यात घेऊन गावाला पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी सातत्याने करण्यात आली होती. या मागणीसाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय, परतूर येथे अन्नत्याग आंदोलनाचा इशाराही देण्यात आला होता. सिंगोना गावातील नागरिकांना या विहिरीतून अनेक वर्षे पाणीपुरवठा होत होता. मात्र सन २०२४ नंतर या विहिरीचा पाणीपुरवठा बंद झाल्याने गावात पाणीटंचाईची गंभीर परिस्थिती निर्माण झाली. विशेषतः एप्रिल–मे महिन्यात गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. शासनाच्या निधीतून उभारण्यात आलेली विहीर अस्तित्वात असताना तिचा उपयोग गावाच्या पाणीपुरवठ्यासाठी का होत नाही, असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर आज प्रशासनाच्या वतीने विहिरीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. विहिरीची स्थिती, पाणी उपलब्धता, पाणीपुरवठ्याची व्यवस्था, विद्युत जोडणी, पाइपलाइन तसेच संबंधित शासकीय नोंदी याबाबत पाहणी करून पंचनामा करण्यात आला. विहिरीच्या मालकीबाबत तसेच ती ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्याबाबतही ग्रामस्थांनी आपली भूमिका प्रशासनासमोर मांडली. या पंचनाम्यामुळे सिंगोना येथील शासकीय विहिरीचा प्रश्न आता अधिकृत नोंदीत आला असून, पुढील प्रशासकीय कार्यवाहीकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. शासनाच्या निधीतून बांधण्यात आलेल्या या विहिरीचा गावाच्या पिण्याच्या पाण्यासाठी तातडीने उपयोग करून देण्यात यावा आणि संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. सदर पंचनामा दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आला. पंचनाम्याच्या प्रक्रियेत धो. द. बोडखे, उप अभियंता,



ग्रामीण पाणीपुरवठा, ग्राम विस्तार अधिकारी पंचायत समिती परतुर परदेशी व ग्रामसेवक जमदाडे, कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा परतुर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश बापू सोळंके तसेच सरपंच ज्ञानेश्वर संदिपान मांटे, विविध सहकारी सोसायटीचे चेअरमन शरदराव भगवानराव सोळंके, सदस्य कृष्णा गोवर्धन सोळंके, यांच्यासह संबंधित ग्रामस्थ व पदाधिकारी उपस्थित होते. सिंगोना गावातील या शासकीय विहिरीचा प्रश्न केवळ एका विहिरीपुरता मर्यादित नसून शासनाच्या निधीतून उभारण्यात आलेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेचा प्रत्यक्ष लाभ ग्रामस्थांना मिळत नसल्याचा गंभीर प्रश्न असल्याचे मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश बापू सोळंके यांनी म्हटले आहे. गावातील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. मनसेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर प्रशासनाने विहिरीचा पंचनामा केल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत असले तरी पंचनाम्यानंतर प्रत्यक्ष विहीर ग्रामपंचायतीच्या ताब्यात देऊन पाणीपुरवठा कधी सुरू होणार, याकडे आता ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. पंचनाम्यावर सिंगोना येथील ग्रामस्थांनी स्वाक्षऱ्या करून आपली भूमिका नोंदवली. त्यामध्ये ज्ञानोबा गणपत गरड, सतीश विठ्ठल सोळंके, उद्धव भाऊदास सोळंके, शेखर मधुकर सोळंके, शिवराज भरत सोळंके, गणेश संभाजी सोळंके, प्रेमाजी नामदेवराव सोळंके, शिताजी सोनाजी सोळंके, बाळासाहेब दत्ताराव शिंदे नाथा लिंबाजी सोळंके, आनंद शिवाजी गरड, नाथराव राजाराम सोळंके, भीमराव मेघाजी गरड, सोनाबा नारायण सोळंके, तुकाराम यशवंतराव सोळंके, रामराव यशवंतराव सोळंके, असराराम राजूजी सोळंके, गुलाब देवराव वाघमारे, गौतम दत्ताराव गरड, लक्ष्मण तुकाराम गरड, धनेराव बाळू गरड, सोपान उत्तमराव सोळंके यांच्यासह इतर ग्रामस्थांचा समावेश आहे. सिंगोना गावाच्या सार्वजनिक पाणीपुरवठ्याचा हा प्रश्न केवळ एका विहिरीपुरता मर्यादित नसून शासकीय निधीतून उभारलेल्या सार्वजनिक सुविधेचा वापर आणि तिचे संरक्षण यांच्याशी संबंधित असल्याने प्रशासन आता पंचनाम्याच्या आधारे कोणती कार्यवाही करते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.




## राजीव गांधी जयंतीनिमित्त हक्काच्या जालना शहर उपक्रमाला प्रारंभ

जालना (प्रतिनिधी) : जालना शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त काँग्रेस कार्यालयात अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या आधुनिक भारताच्या उभारणीतील योगदानाला उजाळा देण्यात आला. यावेळी जालना शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शहर परिवर्तन



गट स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली. तसेच 'हक्काच्या जालना शहर' या जनसंपर्क व जनआंदोलन उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून शहरातील प्रत्येक प्रभाग व वॉर्डात जाऊन नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेण्यात येणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी, शेतकऱ्यांचे प्रश्न, कामगारांच्या समस्या, पाणीपुरवठा, वीज, रस्ते, स्वच्छता, आरोग्य सुविधा यांसह विविध नागरी प्रश्नांबाबत नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या तक्रारी व मागण्या संकलित केल्या जाणार आहेत. त्यानंतर संबंधित प्रश्न प्रशासनापुढे मांडून (पान ३ वर)

## विचार मरत नाहीत.. ते पिढ्यानपिढ्या लढण्याची ताकद देतात : दिपक डोके
### डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या १३ व्या स्मृतीदिना निमित्त अभिवादनाचा कार्यक्रम संपन्न

जालना/प्रतिनिधी : जालना शहरातील महाप्रजापती बौद्ध विहार जयनगर येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या १३ व्या स्मृति दिनानिमित्त वंचित बहुजन आघाडीचे राज्य कार्यकारिणी सदस्य दिपक डोके यांच्या अध्यक्षतेखाली अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमा प्रसंगी अंधश्रद्धा , अज्ञान आणि अन्याया विरूद्ध आयुष्यभर लढणारे डॉ. नरेंद्र दाभोळकर



यांना स्मृतीदिनी विनम्र अभिवादन करण्यात आले त्यांच्या अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार वैज्ञानिक विवेकवादी दृष्टिकोन व जिवन कार्यास मान्यवरांनी आपले विचार मांडून उजाळा दिला यावेळी वंचित बहुजन आघाडीचे राज्य कार्यकारिणी सदस्य दिपक डोके यांनी बोलतांना सांगितले की, विचार मरत नाहीत.. ते पिढ्यानपिढ्या लढण्याची ताकद देतात... डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या विचारांची स्मृति कायमच पिढ्यानपिढ्या आठवणीत राहतील असे प्रतिपादन यावेळी केले यावेळी भंते रेवत, राजेंद्र खरात एम.व्ही चौधरी, गाडगे श्रीराम उघडे, सुकदेव बोर्डे, विलास दाभाडे, प्रशांत खंडागळे, किरण कोळी, लताबाई रनविर, मालताबाई बोर्डे,नंदा साळवे बनकर, भोरजार, चंद्रकलाबाई बनकर, पंचशीला पारधे, कांताबाई म्हस्के, रंजना गाडगे, सिमा सदावर्ते, अलका डोके, अस्मिता डोके, शारदा कोळे यांच्या सह मोठ्या संख्येने फुले शाहू आंबेडकरवादी नागरिक उपस्थित होते.

# संपादकीय

## तर त्यांना ताकद मिळेल

राजकारणात मिळवलेल्या यशाचं 'पूर्ण यशा'त रूपांतर होईपर्यंत थांबणं केव्हांही श्रेयस्कर असतं. पुढची खेळी खेळण्याची संधी प्रत्येकालाच असते! भारतीय जनता पक्ष खरंतर ओळखला जातो त्याच्या मजबूत संघटनेमुळे. या पक्षाच्या परिवारात अनेक अनेक संस्था, संघटना आहेत आणि या प्रत्येकाची संघटनात्मक रचना, बांधणी, यंत्रणा मजबूत आहे. भाजपच्या या वैशिष्ट्यांची तुलना होऊ शकेल, असा दुसरा पक्ष देशात नाही. त्यामुळे, भाजपला आव्हान देणं कोणासाठीही अशक्य आहे, असं वाटत असतानाच देशाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या तोंडून सहज निसटलेल्या एका उद्गारातून एक आंदोलन उभं राहतं आणि जे गेल्या बारा वर्षात घडलं नाही, अशी माघार सरकारला घ्यावी लागते, हे देशात सर्वांसाठीच विचार करण्यासारखं आहे. 'सरकारचा किंवा भाजपचा पराभव' यासारख्या उथळ आणि वरकरणी विश्लेषणाचा हा मुद्दा नाही. ज्या वयोगटातून हे आंदोलन उभं राहिलं, फैलावलं, त्यातून व्यवस्थेविषयी जी चीड निर्माण झाली, त्याचा धोरणकर्ते आणि समाजचिंतकांनी खोलात जाऊन विचार करण्याची गरज आहे. ही गरज ज्यांच्या लक्षात येईल, त्यांनाच येणाऱ्या काळाचा अंदाज घेता येईल. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतल्या पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनीही सरकारच्या प्रयत्नात अडथळे येईल, असं वागणं टाळलं, तर बरं. अन्यथा, आज नसलेली 'कॉक्रोच पार्टी' उद्या खरोखरच उभी राहील. भारतात सरकारकडे एवढी प्रचंड शासनक्षमता आहे, की तिचा पूर्ण वापर करण्याची वेळ क्वचितच येते. इथलं सामाजिक, राजकीय वातावरणही विवेकी, परिपक्व आहे. लोकशाही शासन व्यवस्था इथे अंगवळणी पडली आहे. इस्लामी देशांसारखा सत्तेच्या पाशवी बळाचा वापर करावा लागत नाही. केंद्र सरकारला घटनादत्त अधिकारांचं मोठं वरदान आहेच; त्यात सरकार नुसतं स्थिर नाही, चांगलं भरभक्कम आहे. देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रभावाखालीच आहे ज्यापक्षाची नोंदणी नाही, पदाधिकारी–कार्यकारिणी नाही, देशात कुठे कार्यालय नाही– असा पक्ष दिल्लीत 'जंतरमंतर'सारख्या ठिकाणी ३७ दिवस सलग आंदोलन करतो; कुठलाही परिचित चेहरा नेता म्हणून नसताना देशभरातून विद्यार्थ्यांचे लोंढेच्या लोंढे दिल्लीला धडकू लागतात, देशातल्या असंख्य शहरांमध्ये विद्यार्थी कोणत्याही प्रस्थापित राजकीय पक्षाच्या पाठिंबा किंवा पुढाकाराशिवाय रोज रस्त्यावर येऊ लागतात, तेव्हा त्या वातावरणाची दखल कोणत्याही, कितीही शक्तिशाली सरकारला घ्यावीच लागते. केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार जनमताविषयी विशेष संवेदनशील असल्याने त्यांना या असंतोषाचा अर्थ, त्यातली ताकद नेमकी समजली. त्यांनी आंदोलकांच्या तिन्ही मागण्या मान्य केल्या. आंदोलन संपलं. विद्यार्थी घरोघरी गेले. हातून निसटून चाललेल्या वातावरणावर केंद्र सरकारने शेवटच्या दोन दिवसांत चांगली पकड मिळवली. हे वातावरण आणखी काही काळ असंच ठेवण्यात सरकारचं हित होतं. आपली 'शासन' म्हणून असलेली ताकद कधी वापरायची आणि 'सत्ताधारी म्हणून न्याय करणारे आम्हीच आहोत' याची केवळ जाणीव देऊन बहुतांश प्रश्न कसे आपल्या सोयीने सोडवायचे, हे कोणत्याही सत्ताधाऱ्यांचं खरं कौशल्य असतं. लोकशाहीत 'सरकार' ही कधीच एक व्यक्ती नसते. सरकारच्या धोरण–नीतीत अनेकांचे आडाखे–विचार–मनसुबे दडलेले असतात. राजकीय प्रश्न हाताळताना यात जेवढी एकवाक्यता असेल, तेवढं त्या सरकारचं यश वाढत असतं. आंदोलन संपवण्यासाठी शेवटच्या दोन दिवसांत शिताफीने ज्या हालचाली झाल्या, त्यावरून या सरकारचं मुत्सद्दीपण अधोरेखित झालं होतं. पण, राजीनामा द्यावा लागलेल्या धर्में द्र प्रधान(उ्हरीशपवीर झीरवहरप)यांचं संसदेच्या आवारात दुसऱ्याच दिवशी जे स्वागत झालं, त्यातून या यशाला गालबोट लागायला सुरुवात झाली, असं दिसतं. विद्यार्थी आंदोलकांवर बिहारमध्ये एके–४७ मधून गोळीबार झाल्याने त्यात आणखी भर पडली. सावरलेली सरकारची प्रतिमा या प्रकरणात पुन्हा घसरण्याची, आंदोलकांच्या सरशीची शक्यता माध्यमांना दिसू लागली. तशा वृत्तांकनाला सुरूवात होत असतानाच संबंधित पोलिस अधिकाऱ्याच्या निलंबनाची घोषणा झाली. आंदोलन मागे घेताना 'आंदोलक विद्यार्थ्यांवर कोणतेही खटले दाखल होणार नाहीत' असं आश्वासन विद्यार्थी नेत्यांनी मिळवलं होतं. पण, घाईघाईने त्यालाही हरताळ फासला जातो आहे, अशा बातम्या दिल्लीसह विविध राज्यांतून येऊ लागल्याने सरकारच्या विश्वासार्हतेचा प्रश्न उपस्थित होऊ लागला होता. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी(उ्शींशपवीर ऋरवपर्रींळी) अत्यंत सावधपणे, राजकीय परिपक्वता दाखवत महाराष्ट्रापुरता हा विषय निकाली काढला. बिहार आणि आसाम सरकारांनीही मग तसा निर्णय घेतला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचीही त्याला जोड मिळाली. आणखी एक दरड ढासळण्यापासून रोखली गेली! भारतात सरकारकडे एवढी प्रचंड शासनक्षमता आहे, की तिचा पूर्ण वापर करण्याची वेळ क्वचितच येते. इथलं सामाजिक, राजकीय वातावरणही विवेकी, परिपक्व आहे. लोकशाही शासन व्यवस्था इथे अंगवळणी पडली आहे. इस्लामी देशांसारखा सत्तेच्या पाशवी बळाचा वापर करावा लागत नाही. केंद्र सरकारला घटनादत्त अधिकारांचं मोठं वरदान आहेच; त्यात सरकार नुसतं स्थिर नाही, चांगलं भरभक्कम आहे. देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रभावाखालीच आहे. अशा परिस्थितीत सत्तेचा 'शासन' म्हणून किंचितही अधिक वापर सरकारच्या प्रतिमेवर विपरीत परिणाम करणारा ठरू शकतो. प्रधान यांचं संसदेच्या आवारातलं स्वागत, बिहारमधला एके–४७ चा वापर किंवा दिल्लीतला 'पॅलेट गन'चा वापर– या तिन्ही घटनांची स्पष्टीकरणं द्यायची वेळ आता सरकारवर आली आहे. संयमाला लवकर सोडचिठ्ठी दिल्याचा हा परिणाम आहे. परिस्थिती हाताळताना पंतप्रधान मोदी कोणत्या नीतीचा अवलंब करताहेत हे जराही लक्षात न घेता झालेल्या या घटनांमुळे सरकारवर आरोपांच्या फैरी सुरू आहेत. फडणवीस यांच्यासारखी भूमिका सर्व पातळ्यांवर घेतली गेली असती, काही काळ जाऊ दिला असता, तर सरकारला आज विरोधकांवर उलट हल्ला करता आला असता. तसे असंख्य मुद्दे असूनही संसदेतली चर्चा वरील मुद्द्यांभोवतीच केंद्रीत झाली आहे. तेच मुद्दे देशभर जात आहेत. आंदोलन मिटवताना चार पावलं पुढे गेलेल्या सरकारला दोन पावलं मागे यावं लागतं आहे. विद्यार्थ्यांना पुन्हा चिथवण्यासाठी वेगवेगळे मुद्दे पुढे आणण्याचा प्रयत्न देशात अनेकांकडून होतो आहे. त्यांना या वातावरणातून ताकद मिळू शकते.

# ठाकरे गटाचे ११ शिलेदार फुटले; तर शिंदेसेनेचे आमदार-खासदार पक्षांतर करणार?

शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का बसला असून धाराशिव जिल्ह्यातील कळंब नगरपालिकेतील ११ नगरसेवकांनी थेट भाजपाचे कमळ हाती घेतले. सर्वोच्च न्यायालयाने धनुष्यबाण चिन्ह गोठवल्यास शिवसेनेचे आमदार–खासदार भाजपाकडे पळाल्याशिवाय राहणार नाही, असे सूचक विधान प्रकाश आंबेडकरांनी केले शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतच्या सुनावणीत आज ठाकरे गटाच्या वतीने वकील देवदत्त कामत यांनी सर्वोच्च न्यायालयात पुन्हा एकदा जोरदार युक्तिवाद केला धनुष्यबाण गोठवण्याची मागणी करणे म्हणजे बाळासाहेबांचे विचार गोठवण्यासारखे आहे, अशी टीका शिंदेसेनेचे मंत्री शंभूराज देसाई यांनी ठाकरे गटावर केली मुंबईतील मोकळ्या जागांवर भाजपाचा डोळा असून मोकळ्या जागा खासगी विकासकांना देण्याचा घाट सत्ताधाऱ्यांनी घातला आहे, असा आरोप आमदार आदित्य ठाकरे यांनी केला.

ठाकरे गटाचे ११ शिलेदार भाजपात शिवसेना ठाकरे गटाला पुन्हा मोठा धक्का बसला असून धाराशिव जिल्ह्यातील कळंब नगरपालिकेतील ११ नगरसेवकांनी थेट सत्ताधारी भाजपात प्रवेश केला. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत सोलापूरमध्ये हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. विशेष बाब म्हणजे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या पक्षातील लोकप्रतिनिधींची बुधवारी बैठक बोलावली होती. या बैठकीकडे या सर्व नगरसेवकांनी पाठ फिरवली होती. त्यामुळे ते पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा रंगली होती. अखेर आज त्यांनी भाजपाचे कमळ हाती घेतले आहे. त्यामुळे धाराशिवमध्ये सत्ताधारी भाजपाची ताकद वाढली असून ठाकरे गटाला बसलेला हा मोठा धक्का मानला जात आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही एकत्र काम करतोय याला 'ऑपरेशन लोटस किंवा ऑपरेशन टायगर' असे म्हणता येणार नाही, अशी प्रतिक्रिया भाजपाने आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

**सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गटाचा युक्तिवाद**

शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबतच्या सुनावणीत आज ठाकरे गटाच्या वतीने वकील देवदत्त कामत यांनी सर्वोच्च न्यायालयात पुन्हा एकदा जोरदार युक्तिवाद केला. अखेरच्या टप्प्यात करण्यात आलेल्या एका युक्तिवादामुळे या प्रकरणाला वेगळे वळण लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. देवदत्त कामत यांनी आज सुरुवातीला सर्वोच्च न्यायालयात सुभाष देसाई प्रकरणातील काही महत्त्वाच्या मुद्द्यांचा हवाला दिला. तसेच आमदारांना अपात्र ठरवण्याबाबत न्यायालयाला अधिकार असल्याचे नमूद केले. या संदर्भातील काही उदाहरणे त्यांनी खंडपीठासमोर मांडली. त्यानंतर आमदारांना अपात्रतेसंदर्भात आम्हाला अधिकार आहेत यात शंका नाही असे खंडपीठानेही मान्य केले. यादरम्यान शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हाबाबत युक्तिवाद करताना कामत यांनी



एखाद्या पक्षातील पाच पैकी तीन आमदार फुटले तर त्यांना पक्ष देणार का? असा प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या या मुद्द्याचा रोख विधानसभा अध्यक्षांनी अध्यक्षांनी दिलेल्या निर्णयाविरोधात होता. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी उद्या होणार आहे.

**तर शिंदेसेनेतील नेते पक्षांतर करणार?**

सर्वोच्च न्यायालयाने धनुष्यबाण चिन्ह गोठवल्यास शिवसेना ठाकरे आणि शिंदे गटाचे आमदार–खासदार भाजपाकडे पळाल्याशिवाय राहणार नाही, असे सूचक विधान वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकरांनी केले. दोन्ही शिवसेनेतील या भांडणाचा फायदा भाजपाला होताना दिसत आहे, असा दावाही त्यांनी केला. अकोला येथे माध्यमांशी संवाद साधताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयात ठाकरे आणि शिंदेसेनेत भांडण सुरू आहे. कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादावरून या खटल्याचा निकाल दिसतो. कदाचित शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह गोठवले जाऊ शकते. तसे झाल्यास दोघांकडे असणारे आमदार, खासदार भाजपाकडे पळाल्याशिवाय राहणार नाहीत. निर्णय कुणाच्याही बाजूने लागो पण फायदा भाजपाचा आहे, असेही आंबेडकर म्हणाले. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

**ठाकरे गटाच्या मागणीवर शिंदेसेनेचा संताप**

शिवसेना नाव आणि धनुष्यबाण चिन्हाचा एकनाथ शिंदे गटाकडून बेकायदा वापर होत असल्याचा युक्तिवाद ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात केला. शिंदे गटाला खरी शिवसेना म्हणून मान्यता देणे म्हणजे 'घटनात्मक पापाला बक्षीस' देण्यासारखे ठरेल, असा दावाही त्यांच्याकडून करण्यात आला. धनुष्यबाण चिन्ह आम्हाला परत देता येत नसेल, तर ते गोठवण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी ठाकरे सेनेच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात केली. त्यावर माध्यमांना प्रतिक्रिया देताना शिंदेसेनेचे मंत्री शंभूराज देसाई यांनी तीव्र संताप व्यक्त केला. धनुष्यबाण हे केवळ एक चिन्ह नसून स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आहेत. धनुष्यबाण गोठवण्याची मागणी करणे म्हणजे बाळासाहेबांचे विचार गोठवण्यासारखे आहे, अशी टीकाही त्यांनी ठाकरे गटावर केली. तसेच पक्ष आणि चिन्ह टिकवण्यासाठी आपल्या पक्षाकडूनही सर्वोच्च न्यायालयात चांगला युक्तिवाद केला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यादरम्यान मंत्री देसाई यांच्या टीकेला आता ठाकरे गट काय प्रत्युत्तर देणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

आदित्य ठाकरे यांची फडणवीसांवर टीका

मुंबईतील मोकळ्या जागांवर भाजपाचा डोळा असून मोकळ्या जागा खासगी विकासकांना देण्याचा घाट सत्ताधाऱ्यांनी घातला आहे, असा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे युवानेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १५ दिवसांत भूखंड देण्याचे आदेश महापालिकेला दिले असून हा घोटाळा थांबला पाहिजे, अशी टीकाही त्यांनी केली. माध्यमांशी संवाद साधताना आदित्य म्हणाले की, मुंबईतील एक मैदान आणि आणखी दोन प्लॉट्स हे मुख्यमंत्री फडणवीस एका भाजपाच्या आमदाराला गिफ्ट करत आहेत. या प्लॉट्सची किंमत १० वर्षांपूर्वी साडेपाचशे कोटी होती. आज याची किंमत किती असेल? पण असे असताना फडणवीस यांनी एका भाजपा आमदाराला हे प्लॉट्स २१ लाख रुपये प्रतिवर्ष या किंमतीवर देण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईतील एकूण तीन भूखंड हे मुख्यमंत्र्यांच्या एका मित्राला म्हणजे एका खासगी संस्थेला देत आहेत. मात्र, आम्ही याला विरोध करणार असून त्याविरोधात रविवारी आंदोलन करणार आहोत, अशी माहितीही त्यांनी दिली.

## मासिक १० हजार रुपये पगार अन् ३ कोटींची GST नोटीस; सुरक्षारक्षकावर रेशन कार्ड, नोकरी गमावण्याची आली वेळ

महिन्याला अवघ्या १० हजार रुपयांच्या वेतनावर सुरक्षारक्षक म्हणून काम करणाऱ्या एका सामान्य व्यक्तीला तब्बल ३ कोटी रुपयांची जीएसटी वसुलीची नोटीस बजावण्यात आली. सदर प्रकार उत्तर प्रदेशातील कानपूरमध्ये समोर आला आहे. या अवाजवी नोटीसमुळे त्रस्त झालेल्या या सुरक्षारक्षकाळा स्वतःची नोकरी गमवावी लागली. शिवाय त्याचे रेशन कार्ड आणि सर्व सरकारी योजनांचे लाभही रद्द करण्यात आले. यामुळे आता उपासमारीची वेळ आली असल्याची संतप्त भावना सुरक्षारक्षकाने व्यक्त केली आहे. ओम शुक्ला असे या पीडित व्यक्तीचे नाव असून ते कानपूरमध्ये एका खासगी कंपनीत सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होते. जीएसटी विभागाने २१ सप्टेंबर २०२५ रोजी बजावलेल्या नोटीसनुसार, शुक्ला यांच्या नावावर नोंदणीकृत असलेल्या 'ओम एंटरप्रायझेस' या बनावट कंपनीच्या माध्यमातून १७ कोटी रुपयांहून अधिक रुपयांची उलाढाल झाल्याचे नमूद करण्यात आले. या व्यवहारापोटी त्यांच्याकडे सुमारे ३ कोटी रुपयांच्या थकीत कराची मागणी करण्यात आली.

कार्यालयांचे उंबरठे झिजवले, पण दिलासा नाही

या प्रकारानंतर शुक्ला यांनी पोलीस आणि जीएसटी कार्यालयात धाव घेतली. एका व्यापारी प्रतिनिधीच्या मदतीने त्यांनी जीएसटी अधिकाऱ्यांची भेट घेतली असता त्यांना सर्वप्रथम या नोटिशीला रीतसर उत्तर सादर करण्याचा सल्ला देण्यात आला. त्यानंतर शुक्ला यांनी नवी दिल्लीतील केंद्रीय जीएसटी मुख्यालय आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या कार्यालयाकडेही दाद मागितली. मात्र कुठूनही त्यांना दिलासा मिळाला नाही. शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवण्यासाठी वारंवार सुट्ट्या घ्याव्या लागल्याने अखेर त्यांची सुरक्षारक्षकाची नोकरीही गेली. दुसरीकडे कर थकीत असल्याच्या नोंदीमुळे त्यांना बँकांकडून कोणतेही कर्ज मिळणे अशक्य झाले आहे. गुन्हे शाखेकडून अखेर तपासाचे आदेश अनेक महिन्यांच्या संघर्षानंतर आता या प्रकरणात काहीसा दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. शुक्ला यांनी मंगळवारी (१८ ऑगस्ट) कानपूरचे पोलीस आयुक्त रघुवीर लाल यांची भेट घेऊन आपली कैफियत मांडली. यानंतर पोलीस आयुक्तांनी या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश गुन्हे शाखेला दिले आहेत. यापूर्वीचे तत्कालीन पोलीस आयुक्त अखिल कुमार यांनीही तपासाचे आश्वासन दिले होते, मात्र त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नव्हती. कागदपत्रांचा वापर करून बनावट कंपनी स्थापन

पोलिस आयुक्तालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, शुक्ला यांच्या पॅन कार्डसह इतर वैयक्तिक कागदपत्रांचा गैरवापर करून अज्ञात व्यक्तीने ही बनावट कंपनी स्थापन केल्याचा संशय आहे. या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई करण्याचे निर्दे श देण्यात आले आहेत. जीएसटी अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह दरम्यान स्थानिक व्यापारी संघटनेने शुक्ला यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला असून त्यांच्या वतीने केंद्रीय जीएसटी विभागाकडे उत्तराचा मसुदा सादर केला जात आहे. जीएसटी क्रमांक जारी करताना प्रत्यक्ष जागेची पाहणी आणि बहुस्तरीय पडताळणीची नियमावली असताना, महिन्याला केवळ १० हजार रुपये कमावणाऱ्या व्यक्तीच्या नावावर कोट्यवधींची उलाढाल कशी दाखवली गेली, असा थेट सवाल उपस्थित करत व्यापारी संघटनेने जीएसटी अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणावर तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

## किरकोळ वादातून प्रवाशाला लोकलमधून खाली ढकलले



मुंबई : चर्चगेट ते बोरिवली दरम्यान धावणाऱ्या एका लोकल ट्रेनमध्ये किरकोळ वादातून एका प्रवाशाला धावत्या डब्यातून खाली ढकलून दिल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. वांद्रे खाडीच्या पुलावर ट्रेन आलेली असताना हा भयानक प्रकार घडला असून या दुर्घटनेत खाली पडलेला प्रवासी गंभीर जखमी झाला आहे. त्याची प्रकृती सध्या अत्यंत चिंताजनक आहे. समोर आलेल्या माहितीच्या आधारे, ही घटना लोकल ट्रेनच्या दिव्यांगाच्या डब्यात घडली. ट्रेन चर्चगेटवरून बोरिवलीच्या दिशेने जात असताना, वांद्रे खाडीजवळ अचानक दोन प्रवाशांमध्ये काही कारणावरून किरकोळ वाद सुरू झाला. हा किरकोळ वाटणारा वाद पाहता पाहता विकोपाला गेला आणि चिडलेल्या एका प्रवाशाने दुसऱ्या व्यक्तीला थेट धावत्या ट्रेनमधून बाहेर धक्का दिला. ट्रेनचा वेग जास्त असल्यामुळे आणि खाली खाडीचा भाग व ट्रॅक असल्यामुळे संबंधित व्यक्ती खाली पडल्याने अत्यंत गंभीर जखमी झाली. या घटनेची माहिती मिळताच वांद्रे लोहमार्ग पोलिसांनी (ऋछझ) तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या प्रवाशाला तातडीने वांद्रे पश्चिमेकडील भाभा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, रुग्णाची प्रकृती चिंताजनक असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. दरम्यान, प्रवाशाला धक्का देऊन जीवे मारण्याचा प्रयत्न करू पाहणाऱ्या आरोपीला वांद्रे लोहमार्ग पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांकडून सध्या या आरोपीची सखोल चौकशी सुरू असून, हा वाद कशावरून झाला होता व यामागची नेमकी कारणं काय आहेत, याचा शोध घेतला जात आहे. दिव्यांगासाठी राखीव असलेल्या डब्यात अशा प्रकारे हिंसक घटना घडल्यामुळे पश्चिम रेल्वेच्या प्रवाशांमध्ये भीती पसरली आहे. रेल्वे पोलिसांकडून डब्यांमधील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## तर लाभ मिळेल

देशातील सरकारी तेल कंपन्या आता 'एलपीजी'चा अपव्यय कमी करण्यासाठी आणि इंधनाचा सर्वोत्तम वापर करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याची तयारी करत आहेत. 'इंडियन ऑइल', 'भारत पेट्रोलियम' आणि 'हिंदुस्तान पेट्रोलियम' यांसारख्या कंपन्या मोठ्या औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांमध्ये 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक सिस्टीम'चा अवलंब करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. या तंत्रज्ञानामुळे 'एलपीजी'चा अधिक चांगला वापर होईल आणि सिलेंडरमध्ये शिल्लक राहिलेल्या गॅसचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल. सामान्यतः, 'एलपीजी' सिलेंडरमधून वाफेच्या स्वरूपात काढला जातो. या प्रक्रियेमुळे सिलेंडरमध्ये काही प्रमाणात 'एलपीजी' शिल्लक राहतो. त्यामुळे इंधनाचा पूर्ण वापर करता येत नाही. 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक' तंत्रज्ञानामध्ये, विशेष उपकरणांचा वापर करून 'एलपीजी' द्रव स्वरूपात काढला जातो. त्यानंतर 'व्हेपोरायझर'द्वारे त्याचे वायूमध्ये रूपांतर केले जाते. यामुळे सिलेंडर जवळजवळ पूर्णपणे रिकामा होतो आणि इंधनाचा अपव्यय कमी होतो. या तंत्रज्ञानाचा फायदा जास्त 'एलपीजी' वापरणाऱ्या उद्योगांना होईल. त्यात हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, केटरिंग, अन्न प्रक्रिया युनिट्स, डेअरी, रासायनिक उद्योग आणि इतर उत्पादन सुविधांचा समावेश आहे. वारंवार आणि मोठ्या प्रमाणात गॅसची आवश्यकता असणाऱ्या संस्थांसाठी हे तंत्रज्ञान खर्च वाचवू शकते आणि कामकाज अधिक कार्यक्षम बनवू शकते. तज्ज्ञांच्या मते, 'एलपीजी'च्या चोख वापरामुळे ग्राहकांसाठी इंधनाचा खर्च कमी होईल. तेल कंपन्यांना सिलिंडर हाताळणे आणि पुन्हा भरण्याशी संबंधित आव्हानांपासूनही दिलासा मिळू शकेल. यामुळे पुरवठा साखळीची कार्यक्षमता वाढेल आणि 'एलपीजी' वितरण प्रणाली अधिक प्रभावी होईल. भारतात 'एलपीजी'ची मागणी सातत्याने वाढत आहे. परिणामी, इंधनाच्या प्रत्येक थेंबाचा यथायोग्य वापर करणे हे सरकार आणि तेल कंपन्यांसाठी प्राधान्य बनले आहे. या धोरणाचा एक भाग म्हणून, ऊर्जेचा अपव्यय कमी करण्यासाठी आणि संसाधनांचा इष्टतम वापर सुनिश्चित करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन दिले जात आहे. भविष्यात मोठ्या औद्योगिक ग्राहकांमध्ये 'लिक्विड एलपीजी ऑफ-टेक सिस्टीम'चा वेगाने विस्तार होईल अशी अपेक्षा आहे. यामुळे केवळ औद्योगिक परिचालन खर्च कमी होणार नाही, तर देशात ऊर्जा कार्यक्षमतेला प्रोत्साहन देण्यासही मदत होईल. आता काही सकारात्मक अर्थवार्ता. रेल्वे बोर्डाने आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी गृहनिर्माण आगाऊ कर्जाचे व्याजदर निश्चित केले आहेत. नवीन आदेशानुसार रेल्वे कर्मचाऱ्यांना आता घर बांधणीसाठी केवळ ७.१ टक्के वार्षिक व्याजदराने निधी मिळणार आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांवरील 'ईएमआय'चा भार थेट कमी होईल आणि महागाईच्या या काळात त्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळेल. रेल्वे बोर्डाने जारी केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार नवीन ७.१ टक्के व्याजदर १ एप्रिल २०२६ पासून लागू झाले आहेत. हा दर ३१मार्च २०२७ पर्यंत मंजूर होणाऱ्या सर्व गृहनिर्माण आगाऊ कर्जांवर लागू होईल. गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने या संदर्भात १३ मे २०२६ रोजी एक निवेदन जारी केले होते. त्याच सरकारी आदेशानुसार रेल्वे बोर्डाने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी हा दर तात्काळ प्रभावाने लागू केला आहे. मागील आर्थिक वर्षात (आर्थिक वर्ष २०२५-२६) गृहनिर्माण आगाऊ रकमेवरील व्याजदर वार्षिक ७.४४ टक्के होता. या विशेष सरकारी आगाऊ रकमेचा वापर केवळ तयार घर खरेदी करण्यापुरता मर्यादित नाही. रेल्वे कर्मचारी त्यांच्या गरजेनुसार विविध उद्देशांसाठी याचा वापर करू शकतात. भूखंड खरेदी करून त्यावर नवीन घर बांधण्याचा विचार करत असाल, तर ही रक्कम उपयुक्त ठरेल. बिल्डरकडून राहण्यासाठी तयार फ्लॅट खरेदी करत असाल किंवा केंद्र, राज्य किंवा गृहनिर्माण संस्थेच्या योजनेअंतर्गत घर खरेदी करत असाल, तर या सुविधेचा सर्वत्र उपयोग करू शकता. मालकीचे घर असल्यास कुटुंब वाढल्यावर नवी खोली किंवा मजला जोडायचा असल्यासही या कर्जाचा लाभ मिळेल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/rni/reg.no.mahmar/59900/93/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# तुकाराम मुंढेंचा मोर्चा आता खाद्य तेलाकडे; सुटे तेल विकण्यास बंदी, विक्रेत्यांना दिला मोठा इशारा

गेल्या काही दिवसांपासून अन्न व औषध प्रशासन विभागाच्यावतीने राज्यभरात भेसळखोरांच्या विरोधात धडक कारवाई करण्यात येत आहे. भेसळयुक्त खाद्यपदार्थांविरोधात तुकाराम मुंढे यांनी कारवायांचा धडाका लावला आहे. मुंढे यांच्या या धडाकेबाज कामाची सध्या राज्यात मोठी चर्चा सुरू आहे. भेसळयुक्त पनीर, भेसळयुक्त दूध, रेस्टॉरंट्स, हॉटेलवरील निकृष्ट दर्जाचं जेवण, शाळांमधील खाणावळी यानंतर आता तुकाराम मुंढे यांनी आपला मोर्चा खाद्यतेलाकडे वळवला आहे. तुकाराम मुंढे यांनी आज (२० ऑगस्ट) पत्रकार परिषद घेत खाद्यतेल विक्रीबाबत महत्वाचे निर्दे श जारी केले आहेत. यापुढे आता सुटे खाद्यतेल विकण्यास बंदी असणार आहे. तसेच खाद्यतेलाबाबत एफडीएच्या नियमांची यादी तुकाराम मुंढे यांनी सांगितली आहे.

**तुकाराम मुंढे काय म्हणाले?**

'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' या अंतर्गत आपण काम करत आहोत, आता आपण काही कंप्लायंस ऑर्डर काढत आहोत. आधी आपण हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मिल्क प्रोडक्टबाबत ऑर्डर काढली होती. राज्यातील शाळांच्या बाबतीत देखील कंप्लायंस ऑर्डर काढली होती. या सर्वांची अंमलबजावणी सुरू आहे. आता 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' या मोहिमेच्या पुढचा एक महत्वाचा टप्पा आहे. याबाबतीत पुढील कंप्लायंस ऑर्डर आपण आजपासून जारी करत आहोत. ही एडीबल ऑईलच्या (खाद्यतेल) संदर्भातील आहे, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

खाद्यतेल हे सर्व नागरिकांच्या घरात असतं. हे खाद्यतेल आपल्याला वेगवेगळे पदार्थ बनवण्यासाठी लागतं. २०११ च्या कायद्यानुसार, लायसन्स असणं किंवा रजिस्टेशन्स असणं आणि फूड प्रॉडक्टच्या बाबतीत जे नियम आहेत ते पाळणं आणि त्यानुसार खाद्यतेलाच प्रोडक्शन होणं आणि विक्री करणं गरजेचं आहे, असं तुकाराम मुंढे यांनी म्हटलं आहे.

गेल्या काही काळात आम्ही काही तपासण्या केल्या असता आम्हाला काही गंभीर मुद्दे आढळून आले आहेत. त्यामुळे यामध्ये जास्त काम करण्याची गरज असल्याचं आमच्या निदर्शनास आलं. खाद्यतेलाची जी इंडस्ट्री आहे. त्यामध्ये पॅकेजिंग असेल किंवा लेबल किंवा ब्रँडवर काम करणाऱ्या आस्थापना. या सर्वांबाबत आमच्या ८ ते १० गोष्टी निदर्शनास आल्या आहेत आणि यामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत, असं तुकाराम मुंढे यांनी सांगितलं आहे.



नवे नियम काय आहेत?

पहिली गोष्ट म्हणजे लायसन्स नसणारे अनेकजण आहेत. त्यांच्याकडे लायसन्स नाही, पण ते या क्षेत्रात काम करत आहेत. मात्र, यासाठी लायसन्स बंधनकारक आहे. ज्यांच्याकडे लायसन्स नसेल त्यांच्यावर कारवाई होईल, असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

दुसरं म्हणजे जे खाद्यतेल आहे, त्यामध्ये भेसळ केल्याचे प्रकार आम्हाला आढळून आलेत. मोहरी तेल जे आहे, त्याचंही अनधिकृत मिश्रण करण्याचे प्रकार आढळून आले आहेत. फक्त मोहरीचं तेल विकता येतं, पण मोहरीचं तेल मिश्रण करून विकता येत नाही, अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी सांगितली.

तसेच तेलाचा खरा स्रोत आणि तारीख व लेबलिंग हे लपवल्याचं निदर्शनास आलं आहे. मुदत संपलेलं तेल पुन्हा विकल्याच्या काही बाबी लक्षात आल्या आहेत. खाद्यतेल सुटे विकले जाते असेही आमच्या निदर्शनास आले आहे. तसेच वारलेल्या किंवा गंजलेल्या किंवा अयोग्य असलेल्या डब्यात तेल भरून त्याची विक्री केली जाते असंही निदर्शनास आलं. अशा अनेक गोष्टी आढळून आलेल्या आहेत. मात्र, आता अशा गोष्टी आढळल्यास कारवाई होईल, असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

तसेच अन्नसंपर्क सामग्री म्हणून घातक प्लास्टिक पॅकिंगचा वापर केला जात आहे. तसेच टँकर्सद्वारे अन्नसुरक्षेच्या नियमांचं उल्लघन करत अयोग्य पद्धतीने खाद्यतेलाची वाहतूक देखील केली जात असल्याचं निदर्शनास आलं. या बरोबरच किरकोळ विक्रेत्याने खाद्यतेल विना-सील किंवा त्याबाबतीत छेडछाड केलेलं तेल विकत घेऊ नये, असं आढळून आल्यास कारवाई होऊ शकते, असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

सुटे तेल विकण्यास बंदी; विक्रेत्यांना दिला इशारा

सुटे खाद्यतेल विकता येत नाही. किरकोळ खाद्यतेल विक्रेत्यांनी आता सुटे तेल खरेदी करू नये. तसेच भेसळयुक्त तेल विकल्यास ७ वर्षांची शिक्षा होऊ शकते आणि १० लाखांचा दंड होऊ शकतो, असा इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

## एसटी कर्मचाऱ्याचे अपहरण करून लूट, दोघे ताब्यात

पुणे बसस्थानक परिसरातून एसटी महामंडळातील लिपिकाचे अपहरण करून निर्जनस्थळी नेत मारहाण करत लूट केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणाचा तपास करत कोतवाली पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने अवघ्या २४ तासांत दोन संशयित आरोपींना सावेडी परिसरातून अटक केली. त्यांच्याकडून लुटीतील मोबाईल, रोकड आणि दुचाकीसह सुमारे ७२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अभिषेक सुनील शिरसाठ (वय २३) आणि अनुष शांतवन धीवर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

१८ ऑगस्ट रोजी फिर्यादी पुणे बसस्थानक परिसरात असताना आरोपींनी त्यांना गाठले. त्यानंतर त्यांना बुरुडगाव रोड परिसरातील निर्जनस्थळी नेण्यात आले. तेथे आरोपींनी लाकडी दांडक्याने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर त्यांच्या खिशातील मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला. आरोपींनी मोबाईलचा तसेच 'फोन पे'चा पासवर्डही बळजबरीने मिळवला.

त्यानंतर फिर्यादीच्या खात्यातून ७ हजार १०० रुपये अनोळखी खात्यावर ऑनलाइन ट्रान्सफर करण्यात आले. पैसे घेतल्यानंतर आरोपींनी फिर्यादीला तेथेच सोडून पलायन केले. याप्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

२४ तासांत संशयितांना बेड्या

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस निरीक्षक नितीन देशमुख आणि गुन्हे शोध पथकाचे पोलिस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू करण्यात आला. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संशयितांचा माग काढला. त्यानंतर सावेडी परिसरातून दोघांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली देत अभिषेक शिरसाठ आणि अनुष धीवर अशी नावे सांगितली.

तसेच प्रवीण शेजवळ (रा. कोंढवड, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) याच्या साथीने हा गुन्हा केल्याचेही समोर आले. पोलिसांनी आरोपींकडून मोपेड दुचाकी, मोबाईल फोन आणि रोकड असा एकूण ७२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक दीपक मेढे करीत आहेत.

## नुकसान झाले तरी भारताने अमेरिकेसोबत अब्जावधींचा करार का केला?

नवी दिल्ली: इराण आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष अद्याप थांबलेला नाही. या संघर्षात अमेरिकेच्या अत्यंत प्रभावी मानल्या जाणाऱ्या एमक्यू-९ (चट-९) ड्रोनचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे समोर आले आहे. असे असतानाही, भारताने सुरक्षेच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत अमेरिकेशी ड्रोनचा करार कायम ठेवला आहे. हिंद महासागरातील सागरी सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी भारताने अमेरिकेसोबत हा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

नवीन भाडेकरार आणि महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये

2020 पासून भारतीय नौदल 'आरपीएएस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भाडेतत्त्वावरील ड्रोनचा वापर करून हिंद महासागरात सातत्याने गस्त घालत आहे. आधीचा भाडेकरार संपल्यामुळे, संरक्षण मंत्रालयाने अमेरिकेच्या जनरल टॉमिक्स एरोनॉटिकल सिस्टीम्ससोबत नवीन करारावर स्वाक्षरी केली आहे.

कालावधी आणि खर्च: भारतीय नौदल पुढील ३० महिन्यांसाठी हे चट-९इ सी गार्डियन ड्रोन चालवणार असून, या नवीन कराराचे एकूण मूल्य १९४३ कोटी रुपये आहे.

अत्याधुनिक क्षमता: हे ड्रोन प्रगत सेन्सर्स, अत्याधुनिक पेलोड्स आणि पृष्ठभागावरील क्षेपणास्त्रांनी सुसज्ज आहेत. हे पाणबुडीविरोधी कारवाया करण्यासह शत्रूची युद्धनौका आणि समुद्राखालील हालचाली नष्ट करण्यास पूर्णपणे सक्षम आहेत.

दीर्घ उड्डाण क्षमता: हे क-डए श्रेणीतील ड्रोन असून, ते ४० हजार ते ५० हजार फूट उंचीवर सलग ३० तास विनाथांबा उड्डाण करू शकतात.

इराण युद्धात काय घडले?

इराण-अमेरिका युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या काही



महिन्यांत अमेरिकेचे ४० हून अधिक चट-९ ड्रोन पाडल्याचा दावा इराणने केला आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतील नौदलाच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी या ड्रोनचा वापर केला गेला होता. या युद्धात अमेरिकेच्या ताफ्यातील एक चतुर्थांश ड्रोन नष्ट झाल्याने अमेरिकेत राजकीय स्तरावर मोठा गदारोळ उडाला असून ट्रम्प प्रशासनाला टीकेला सामोरे जावे लागले आहे.

..तरीही भारताने हा करार का केला?

या सर्व पार्श्वभूमीवर प्रश्न उपस्थित होतो की, युद्धाच्या मैदानात ड्रोन निकामी ठरत असताना भारताने खरेदीचा निर्णय का घेतला?

१. विशाल सागरी क्षेत्राची सुरक्षा: भारतीय नौदलाला संपूर्ण हिंद महासागरातील सुमारे ७ कोटी चौरस किलोमीटर क्षेत्राचे रक्षण आणि निरीक्षण करावे लागते. यात २६/११ सारखे हल्ले रोखणे, सागरी तस्करी आणि चीनच्या हालचालींवर वचक ठेवणे यांसारख्या आव्हानांचा समावेश आहे.

२. मानवी जीवाची सुरक्षितता: जर या ड्रोनऐवजी पायलट असणारी टेहळणी विमाने वापरली असती, तर युद्धाच्या काळात पायलटचा जीव धोक्यात आला असता. ड्रोनमुळे मानवी जीवाची हानी टळते.

३. मानवी मर्यादांवर मात: मानवी वैमानिक सलग ३० तास उड्डाण करू शकत नाहीत. दिल्ली ते न्यूयॉर्क हे थेट विमान उड्डाणही नॉनस्टॉप १३ तासांचे असते, त्यामुळे वैमानिकाला मर्यादा येतात. अशा वेळी ही मानवरहित विमाने अत्यंत उपयुक्त ठरतात.

या सर्व धोरणात्मक फायद्यांचा विचार करून भारताने यापूर्वीच ऑक्टोबर २०२४ मध्ये ३१ चट-९इ प्रीडेटर ड्रोन खरेदी करण्यासाठी ३.५ अब्ज डॉलर्स (अंदाजे ३४,००० कोटी रुपये) मूल्याच्या मोठ्या करारावर स्वाक्षरी केली आहे. भारताला लवकरच स्काय गार्डियन आणि सी गार्डियन ही दोन्ही प्रकारची प्रगत विमाने टप्प्याटप्प्याने मिळणार असून, यामुळे देशाची हवाई, भूमी आणि सागरी सीमा सुरक्षा आणखी अभेद्य होणार आहे.

## मच्छीमारांच्या नुकसान भरपाईचा प्रश्न 'टीस'च्या अहवालानंतर दोन महिन्यात मार्गी लावणार





मुंबई : वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छीमारांच्या प्रलंबित नुकसान भरपाईबाबत निकष ठरवण्यासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसकडून (टीझ) सविस्तर अभ्यास केला जात आहे. त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोन महिन्यात मच्छीमारांना भरीव नुकसान भरपाई देण्याचा सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी येथे सांगितले. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून बैठक झाली. यावेळी मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे, विभागाचे सचिव एम. रामास्वामी, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, माजी आमदार किरण पावसकर, मच्छिमार संघटनेचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. कोस्टल रोड प्रकल्पामुळे बाधित झालेल्या मच्छीमारांपैकी अद्याप काही जणांना नुकसान भरपाई मिळालेली नाही, असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. याबाबत लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. राज्य शासन मच्छीमारांच्या पाठीशी असून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मच्छीमारांच्या नुकसान भरपाईचे निकष ठरवण्यासाठी टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसकडून करण्यात येत असलेला अभ्यास तसेच जुहू-वर्सोवा परिसरात जेटी, नेट फिक्सिंग, आणि ड्रायिंग यार्ड यांसारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली.

## 'एआय स्मार्ट गॉगल्स'च्या वापराबाबत येणार निर्बंध; राज्य सरकारचे 'एसओपी' तयार करण्याचे निर्देश

मुंबई : कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित स्मार्ट गॉगल्स आणि चष्म्यासारख्या आधुनिक उपकरणांमुळे राष्ट्रीय सुरक्षेसह नागरिकांच्या वैयक्तिक गोपनीयतेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर, अशा उपकरणांमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्यांचे मूल्यमापन करण्यासाठी आणि त्यांच्या वैध वापराबाबत सर्वसमावेशक मानक कार्यप्रणाली (एसओपी) तयार करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासंदर्भातील एक सदस्यीय समितीची गुरुवारी घोषणा करण्यात आली. सध्या जागतिक पातळीवर एआय आधारित स्मार्ट गॉगल्स आणि चष्म्यांचा वापर करून फोटो काढणे, व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे, लाईव्ह स्ट्रिमिंग करणे तसेच मोठ्या प्रमाणावर डेटा संकलन करण्याचे प्रमाण वाढले आहे. या तंत्रज्ञानामुळे सार्वजनिक तसेच अतिसंवेदनशील ठिकाणी सुरक्षेला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या बाबी गांभीर्याने घेत राज्य सरकारने महाराष्ट्र राज्य सायबर गुन्हे समन्वय केंद्राचे प्रमुख अपर पोलीस महासंचालक यांच्या



नेतृत्वाखाली एक सदस्यीय समिती नेमली आहे. ही समिती एआय उपकरणांची तांत्रिक क्षमता, थेट प्रसारण, फेशियल रिकग्निशन (चेहरा ओळखणारी यंत्रणा) आणि डेटा संकलनाच्या स्वरूपाचा सखोल अभ्यास करणार आहे. तसेच मंत्रालय, शासकीय कार्यालये, पोलीस ठाणी, न्यायालयांचे परिसर, विमानतळे, रेल्वे स्थानके, ऊर्जा प्रकल्प, बंदरे, संरक्षणाशी संबंधित संवेदनशील ठिकाणे, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, धार्मिक आणि सार्वजनिक स्थळांच्या ठिकाणी या उपकरणांमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांचे मूल्यमापन केले जाईल. नव्या नियमांनुसार एआय उपकरणांचा वापर नेमका कसा करावा आणि कसा करू नये, याबाबत सुरक्षा प्रोटोकॉल तयार करण्याचे काम ही समिती करेल. तसेच, सार्वजनिक व संवेदनशील ठिकाणी अशा उपकरणांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी सुरक्षा अधिकारी आणि यंत्रणांसाठी विशेष प्रशिक्षण मॉड्यूल आणि मार्गदर्शक तत्त्वे देखील विकसित केली जाणार आहेत. या उपकरणांच्या वैध वापरासह अन्य सर्व बाबींचा समावेश असलेला सविस्तर अहवाल व शिफारसी आगामी चार महिन्यांत सादर करण्याचे निर्देश या समितीला देण्यात आले.

पान ४ वरून

### विद्यार्थ्यांसाठी दिलासा!

ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमांसाठी, प्रवेश आणि परीक्षांसहित संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पार पाडली जाईल, ज्यामुळे पात्र विद्यार्थ्यांना कुठूनही प्रवेश घेता येईल. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी अर्ज उउऊजए प्रवेश पोर्टलद्वारे सादर करता येतात. प्रवेश प्रक्रियेसंबंधी तपशील विद्यापीठाच्या उउऊजए वेबसाइटवर उपलब्ध आहे. (चींलरळ णपळींशीळीूं)

सोयीस्कररित्या शिक्षण

विद्यापीठाने सांगितले की, सीडीओई (उउऊजए) सोयीस्कर शिक्षण पर्याय, परवडणारी फी आणि यूजीसीच्या (णॠउ) दूरस्थ शिक्षण ब्युरो व एआयसीटीई (-खउढए) द्वारे मान्यताप्राप्त अभ्यासक्रम उपलब्ध करून देते. या केंद्रात शैक्षणिक आणि व्यावसायिक अनुभव असलेले पूर्ण-वेळ प्राध्यापकही आहेत. विद्यार्थ्यांना सहाय्य करण्यासाठी, सीडीओईने चर्चगेट, ठाणे, कल्याण, रत्नागिरी, सावंतवाडी आणि पालघर येथे प्रादेशिक केंद्रे स्थापन केली आहेत, जिथे विद्यार्थ्यांना प्रवेशासंबंधी मार्गदर्शन आणि अभ्यासाचे साहित्य मिळू शकते. ज्या विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षण पद्धतीद्वारे आपले शिक्षण पूर्ण करणे शक्य होत नाही, तसेच ज्या पात्र विद्यार्थ्यांना नियमित महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळू शकला नाही, अशा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, हे या केंद्राचे उद्दिष्ट आहे. सीडीओईचे संचालक प्रा. शिवाजी सरगर यांनी पात्र

पान १ वरून

### न्या. यशवंत वर्मा

म्हणणे आहे. उच्च न्यायालयाच्या वेबसाइटवरही प्रश्न सीजेएआरने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर न्यायमूर्ती वर्मा यांच्या स्थितीबाबतही प्रश्न उपस्थित केला आहे. राजीनामा दिल्यानंतरही वेबसाइटवर त्यांना अद्याप कार्यरत न्यायमूर्ती म्हणून दाखवले जात असल्याचा दावा संघटनेने केला आहे. कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये यासाठी ही माहिती तातडीने अपडेट करण्याची मागणी सीजेएआरने उच्च न्यायालयाकडे केली आहे. यापूर्वी सीजेएआरने तत्कालीन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी न्यायमूर्ती वर्मा यांच्या निवासस्थानी रोकड सापडल्याच्या आरोपांशी संबंधित महत्त्वाची माहिती सार्वजनिक करण्याच्या निर्णयाचे स्वागत केले होते. गंभीर भ्रष्टाचार किंवा गैरवर्तनाच्या आरोपांवर कारवाई करताना पारदर्शकता ठेवणे हे न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी आवश्यक असल्याचे संघटनेने म्हटले होते.

### महाराष्ट्रात पावसाचा

शक्यता. २२ ऑगस्टचा विभागवार हवामान अंदाज कोकण - बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता. मध्य महाराष्ट्र - तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता. मराठवाडा - काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता. विदर्भ - काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता. २३ ऑगस्टचा विभागवार हवामान अंदाज कोकण - बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता. मध्य महाराष्ट्र - तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता. मराठवाडा - काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता. विदर्भ -बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता.

### राजीव गांधी जयंतीनिमित्त

त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाणार असल्याचे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले. राजीव गांधी यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत सर्वसामान्य जनतेच्या हक्कासाठी संघर्ष करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आगामी काळात व्यापक जनआंदोलन उभारण्यात येईल, असेही पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक विनायक चिटणीस, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे, करीम बिल्डर, आरिफ खान, शिवम जैस्वाल, ड. रामेश्वर गावणे, योगेश कदम, वसीम खान, दिनेश सुराणा, चंद्रकांत रत्नपारखे, श्लोक अग्रवाल, देवराज डोंगरे, कलीम खान, शेख वसीम, जमीर शेख, इम्रान खान, वैभव निर्मल, रज्जाक शेख, माऊली हिंगोले, नूर मोहम्मद, ज्ञानेश्वर पाटील, सार्थक मेंढरे, आदित्य कांबळे, अंकुश शिंदे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रघुवीर गुडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कृष्णा पडुळ यांनी केले.

# आईपासून दुरावलेली चार वर्षीय आरोही पोलिसांच्या प्रयत्नांनी सुखरूप घरी



लातूर : देवणी येथील आठवडी बाजारात आईपासून दुरावलेल्या अवघ्या चार वर्षीय आरोहीचा देवणी पोलिसांनी अवघ्या चार तासांत शोध घेऊन तिला सुखरूप वडिलांच्या ताब्यात दिले. मुलीला व्यवस्थित बोलता येत नसल्याने तिची ओळख पटविणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. मात्र, पोलिसांनी संवेदनशीलता आणि तत्परता दाखवत सोशल मीडियाच्या माध्यमातून माहिती प्रसारित करून तिच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचविण्यात यश मिळविले.

सायंकाळी चारच्या सुमारास देवणी येथील आठवडी बाजार परिसरात आरोही ही चार वर्षीय मुलगी पोलिसांना हरवलेल्या अवस्थेत आढळून आली. आईपासून दुरावल्यामुळे ती अत्यंत घाबरलेली होती. तिला व्यवस्थित बोलता येत नसल्याने तिचे नाव, पत्ता किंवा पालकांची माहिती मिळविण्यात अडचणी येत होत्या. देवणी पोलिसांनी तात्काळ मुलीची काळजी घेत तिच्या पालकांचा शोध सुरू केला. मुलीची ओळख पटविण्यासाठी तिचे छायाचित्र आणि माहिती सोशल मीडियाच्या विविध माध्यमांतून प्रसारित करण्यात आली.

मुलीचे वडील अजय चव्हाण अशिक्षित असून त्यांच्याकडे मोबाईल फोनही नसल्याचे समोर आले. मात्र, सोशल मीडियावर प्रसारित झालेली माहिती त्यांच्या नातेवाईकांपर्यंत पोहोचली. त्यानंतर सायंकाळी आठच्या सुमारास अजय चव्हाण देवणी पोलीस ठाण्यात दाखल झाले. पोलिसांनी आवश्यक पडताळणी करून आरोही ही अजय चव्हाण यांचीच मुलगी असल्याची खात्री केली. त्यानंतर तिला सुखरूप वडिलांच्या ताब्यात देण्यात आले. चार तासांच्या प्रयत्नांनंतर मुलगी पालकांच्या स्वाधीन झाल्याने कुटुंबीयांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

# नऊ महिन्यांपासून वेतन रखडले; शिक्षक-शिक्षकेतर कर्मचार्यांवर उपासमारीची वेळ : प्रहार शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अविनाश तांदळे



जालना : प्रतिनिधी : परळी वैजनाथ येथील श्री वैद्यनाथ विद्यालयातील माध्यमिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांचे मागील नऊ महिन्यांपासून वेतन प्रलंबित असल्याने कर्मचार्यांसमोर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. वेतनाचा प्रश्न तातडीने सोडवावा, या मागणीसाठी प्रहार शिक्षक संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अविनाश तांदळे यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहात उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार आणि धनंजय मुंडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. शाळेतील कर्मचार्यांचे वेतन मागील नऊ महिन्यांपासून थकीत असल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर आर्थिक अडचणींचा सामना करण्याची वेळ आली आहे. याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी तीन दिवसांत वेतनाचा प्रश्न सोडविण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, या आश्वासनाला एक महिना उलटूनही वेतनाचा प्रश्न मार्गी लागलेला नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वेतन रखडल्यामुळे कर्मचार्यांसह विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामकाजावरही परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली. दरम्यान, संबंधित शाळेत मागील सहा वर्षांपासून संस्थेचा नियमित मुख्याध्यापक नसल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. सेवा ज्येष्ठतेच्या निकषानुसार पात्र मुख्याध्यापकाची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे करण्यात आली होती. मात्र, अद्याप याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे तांदळे यांनी सांगितले. या प्रकरणाची दखल घेत सुनेत्राताई पवार आणि धनंजय मुंडे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकार्यांना संबंधित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्यांना नियमानुसार वेतन देण्याबाबत आपल्या स्तरावरून आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. वेतनाचा प्रश्न तातडीने निकाली काढून कर्मचार्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी अविनाश तांदळे यांनी केली.

# तहसीलदार उप जिल्हाधिकारी, तर २५नायब तहसीलदार तहसीलदारपदी पदोन्नत

मुंबई : महसूल प्रशासन अधिक सक्षम आणि गतिमान करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने राज्यातील ५७ तहसीलदारांना उप जिल्हाधिकारी (गट-अ), तर २५ नायब तहसीलदारांना तहसीलदार (गट-अ) पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामुळे महसूल प्रशासनातील एकूण ८२ अधिकार्यांना पदोन्नतीचा लाभ मिळणार असून रिक्त पदांमुळे निर्माण झालेली प्रशासकीय अडचण कमी होऊन कामकाजाला गती मिळणार आहे.

सन २०२५-२६ च्या निवडसूचीनुसार एस-१९ वेतनश्रेणीतील ५७ तहसीलदारांना एस-२० वेतनश्रेणीतील उप जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे. तर पूरक निवडसूचीनुसार २५ नायब तहसीलदारांना एस-१४ वरून एस-१९ वेतनश्रेणीत तहसीलदारपदी पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नत उप जिल्हाधिकार्यांची सविस्तर पदस्थापना सध्या सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमातील काम पूर्ण झाल्यानंतर महसूल विभाग वाटप नियम, २०२१ नुसार स्वतंत्र आदेशाने करण्यात येणार आहे. नायब तहसीलदारांच्या पदस्थापनांचे आदेशही स्वतंत्रपणे काढण्यात येतील. नायब तहसीलदारांच्या पदोन्नतीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अंतिम मान्यतेची अट लागू आहे. तसेच उप जिल्हाधिकारीपदी पदोन्नत अधिकार्यांना पुढील पदोन्नतीपूर्वी संबंधित महसुली विभागात किमान तीन वर्षे सेवा करावी लागणार आहे.

# ग्रामीण भागात उत्कृष्ट नेत्रचिकित्सा मिळवून देण्यासाठी लायन्स परिवार कटिबद्ध:बियाणी

## लायन्स क्लबची आता बीड जिल्ह्यात नेत्र सेवा; शिरसाळा येथे आय केअर व्हिजन सेंटरचा शुभारंभ

जालना (प्रतिनिधी) : मानव कल्याणाच्या उद्देशाने स्थापन झालेली लायन्स इंटरनॅशनल ही संस्था आता ग्रामीण भागातील तळागाळातील रुग्णांपर्यंत पोहोचत आहे. गरजू रुग्णांना माफक दरात उत्कृष्ट नेत्रचिकित्सा आणि उपचार मिळवून देण्यासाठी लायन्स परिवार कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन लायन्स प्रांत ३२३४ एच २ चे गॅट कॉर्डिनेटर सुनील बियाणी यांनी केले.

लायन्स क्लब ऑफ परतूर ग्रामीण भागातील रुग्णांपर्यंत दर्जेदार व अल्पदरात नेत्रसेवा पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील असून, वर्षभरापूर्वी बीड येथे मातोश्री लॉयन्स नेत्रालय कार्यान्वित करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुके आणि मोठ्या बाजारपेठेच्या गावात नेत्र चिकित्सा करून बीड येथील नेत्रालयात गरजू रुग्णांची माफक दरात आणि मोफत मोतीबिंदू व तत्सम नेत्रशस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. या नेत्रालयांतर्गत बीड जिल्ह्यातील शिरसाळा (ता. परळी) येथे श्री गणेश आय केअर व्हिजन सेंटरचे उद्घाटन सुनील बियाणी यांच्याहस्ते संपन्न झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परतुर येथील दृष्टी लायन्स नेत्रालयाचे संस्थापक अध्यक्ष मनोहर खालापुरे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून लायन्स आय क्लब परतूरचे अध्यक्ष महेश होलानी, मातोश्री लायन्स नेत्रालय बीडचे अध्यक्ष बाळासाहेब बेद्रे, शिरसाळ्याचे सरपंच नजीरभाई शेख, श्रीकृष्ण मल्टिस्पेशालिटी डेंटल क्लिनिकचे डॉ. कृष्णा फड, जालना लायन्स फाउंडेशनचे कोषाध्यक्ष रतन बजाज आदी मान्यवर उपस्थित होते.



अध्यक्षीय भाषणात मनोहर खालापुरे यांनी डोळ्यांच्या विविध आजारांचे गांभीर्य स्पष्ट करत मराठवाड्यातील लायन्सच्या नेत्र सेवेचा आढावा मांडला. ते म्हणाले की, मराठवाड्यात लायन्सचे ७ ते ८ अद्ययावत हॉस्पिटल्स अविरतपणे कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या शहरांत न जाता स्थानिक पातळीवरच डोळ्यांची तपासणी व्हावी, या हेतूने शिरसाळा येथे हे व्हिजन सेंटर सुरू करण्यात आले आहे. येथे केवळ ५० रुपयांत अत्याधुनिक संगणकीय तपासणी होणार असून मोतीबिंदू व इतर शस्त्रक्रिया बीड येथील मातोश्री लायन्स नेत्रालयात अत्यंत माफक दरात केल्या जातील.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्हिजन सेंटरचे ऑप्थोलॉजिस्ट गौरव शिंदे यांनी केले. शिरसाळा परिसरातील नागरिकांनी या माफक दरातील सर्वसमावेशक नेत्र तपासणी व उपचार सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास परिसरातील नागरिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी अंबड शहरास भेट देऊन विविध उपक्रमांचा आढावा घेतला

अंबड, दि. २० ऑगस्ट (विशेष प्रतिनिधी): जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी मा. आशिमा मित्तल यांनी आज अंबड शहरास भेट देऊन विविध शासकीय कामकाजाचा तसेच अंबड नगरपरिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेतला.

या भेटीदरम्यान जिल्हाधिकार्यांनी नगरपरिषदेच्या विविध विभागांच्या कामकाजाची पाहणी केली. सकाळी त्यांनी शहरातील श्री मत्स्योदरी देवी मंदिरात दर्शन घेतले, त्यानंतर नगरपरिषद कार्यालयास भेट दिली. नगरपरिषदेच्या वतीने नगराध्यक्षा मा. देवयानी केदार कुलकर्णी यांनी त्यांचे स्वागत केले.

भेट-दहर्‍यातील प्रमुख मुद्दे:

विकासकामे व विभाग: जिल्हाधिकार्यांनी नगरपरिषदेच्या विविध विभागांच्या कामकाजाची आणि सुरू असलेल्या विकासकामांची माहिती घेतली. मुख्याधिकारी श्री. राहुल सुर्यवंशी यांनी 'हजेरी ॲप'विषयी सखोल माहिती दिली. अभिलेख कक्ष: नगरपरिषदेच्या अभिलेख कक्षाला भेट देऊन अभिश्रशखांचे जतन, वर्गीकरण व व्यवस्थापनाबाबत त्यांनी माहिती घेतली. महिला बचत गट: राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत (NULM²) स्थापित बचत गटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तूंच्या प्रदर्शन व विक्री केंद्रास भेट देऊन महिलांच्या हस्तकलेचे आणि उत्पादनांचे कौ कौतुक केले. नागरिक संवाद: नगरपरिषद कार्यालयात उपस्थित नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या, सूचना व नागरी सुविधांची माहिती जाणून घेतली. घनकचरा व्यवस्थापन: घनकचरा व्यवस्थापन साईटला प्रत्यक्ष भेट देऊन संकलन, वाहतूक, विलगीकरण व प्रक्रिया या कामांची पाहणी केली आणि शहर स्वच्छतेबाबत महत्त्वाच्या सूचना दिल्या.



यावेळी नगराध्यक्षा देवयानी केदार कुलकर्णी, मुख्याधिकारी श्री. राहुल सुर्यवंशी, न.प. सदस्य, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. जिल्हाधिकार्यांच्या या भेटीमुळे नगरपरिषदेच्या विकासकामांना व महिला सक्षमीकरणाच्या उपक्रमांना अधिक प्रोत्साहन मिळणार आहे.

# मुंबई - गोवा महामार्गावरील कार अपघातात एका महिलेचा मृत्यू, तिघेजण गंभीर जखमी






मुंबई : मुंबई-गोवा महामार्गावरील झाराप-पत्रादेवी बायपासवर इन्सुली येथे रस्त्यावरील खड्ड्यामुळे एका कारचा भीषण आपघात झाला. या अपघातात कारमधील एका महिलेचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला असून इतर तीन प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. या अपघाताचा व्हिडीओ महामार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

दीव-दमण येथून पर्यटनासाठी गोव्याच्या दिशेने जात असताना इन्सुली येथे चालकाला महामार्गावरील मोठ्या खड्ड्यांचा अंदाज आला नाही. यामुळे सुसाट कार अचानक खड्ड्यात आदळल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार थेट रस्त्याच्या डिव्हायडरवर जाऊन आदळली. टक्कर इतकी भयंकर होती की, कारमधील एक महिला प्रवासी तब्बल २० फूट उंच उडून थेट रस्त्यावर फेकली गेली. अपघाताची खबर मिळताच स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमींना बाहेर काढले आणि उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, दुखापत इतकी गंभीर होती की, उपचारादरम्यानच महिलेचा मृत्यू झाला. इतर तिघे गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या भीषण अपघातामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील खड्ड्यांचा आणि प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# केजरीवाल तुम्ही अभिजीत दिपकेला इतकंही शिकवलं नाही', पीएम केअर्स फंडाच्या वापराची मागणी केल्यानंतर भाजपाची टीका

कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी ग्रामीण भागातील शाळांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये सुधार करण्यासाठी 'शाळा ठीक करा' मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत स्वतः अभिजीत दिपके हे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शाळांची पाहणी करत आहेत. तर सीजेपीचे इतर सहकारी त्या त्या राज्यात अशाप्रकारची पाहणी करत आहेत. या पाहणीत शाळांमधील दुरवस्था सोशल मीडियावर दाखवली जात आहे. शाळांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त शाळांच्या उभारणीसाठी पीएम केअर्स फंडाचा वापर करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली होती. यावर आता भाजपाने टीका केली आहे.






भाजपा गोवाने आपल्या सोशल मीडिया हँडलवरून अभिजीत दिपकेंसह 'आप' पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनाही लक्ष्य केले आहे. कॉक्रोच जनता पार्टी हा 'आप'चा पेट प्रोजेक्ट असून अरविंद केजरीवाल यांनी दिपकेंना व्यवस्थित प्रशिक्षण दिले नसल्याचा आरोप गोवा भाजपाने केला आहे. पीएम केअर्स फंड हा आपत्कालीन आणि आपत्तीसारख्या परिस्थितीत वापरण्यासाठी राखीव आहे. केजरीवाल तुम्ही तुमच्या माणसांना नाटकीपणा चांगला शिकवला आहे, पण त्यांना वस्तुस्थितीची माहिती कशी घ्यावी, हे शिकवले नाही. याबद्दल बिलकूल आश्चर्य वाटत नाही, अशी टीका भाजपाने एक्सवर केली आहे. अभिजीत दिपके यांनी आम आदमी पक्षाचे सरकार असलेल्या पंजाबमध्ये जाऊन तिथल्या शाळांची परिस्थिती दाखवावी, असेही आव्हान गोवा भाजपाने दिले आहे. केजरीवालांचा उल्लेख करताना एक्स पोस्टमध्ये पुढे म्हटले, तुम्ही दिपकेंना पंजाबमध्ये कधी घेऊन जाणार आहात? तुमच्या पंजाबमधील कथित जागतिक दर्जाच्या शाळांचीही पाहणी करू द्या. पंजाबची जनता या शाळांमुळे त्रस्त झाली आहे.



पीरपिंपळगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे अंतर्गत येणाऱ्या गावातील आशांची मासिक आढावा बैठक दि.२० रोजी घेण्यात आली. यावेळी वैद्यकिय अधिकारी डॉ.विवेक कोल्हे, एल.एच.ओ. मीरा पाझाडे, गटप्रटवर्तक दीपा रगडे, विद्या म्हस्के यांच्यासह आशांची उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांसाठी दिलासा! मुंबई विद्यापीठाच्या CDOE प्रवेशाची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत

मुंबई : मुंबई विद्यापीठाने आपल्या दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत (उऊज्ए) चालवल्या जाणाऱ्या विविध पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ऑनलाइन प्रवेशाची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढवली आहे. या मुदतवाढीमुळे पात्र विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाइन शिक्षण प्रणालीद्वारे दिल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्यास अतिरिक्त वेळ मिळाला आहे. प्रवेश प्रक्रिया राष्ट्रीय शिक्षण धोरण (छएझ) २०20 नुसार राबवली जात आहे. (चींलरळ णपर्ळींशीळीूं) पदवी आणि पदव्युत्तर कार्यक्रम पदवीपूर्व स्तरावर, उऊज्ए मध्ये इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल, ग्रामीण विकास, मराठी, हिंदी आणि इंग्रजी या विषयांमध्ये बीए अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. इतर अभ्यासक्रमांमध्ये बीकॉम, बीकॉम इन अकाउंटिंग फायनान्स, माहिती तंत्रज्ञानमधील बीएससी आणि संगणक विज्ञानमधील बीएससी यांचा समावेश आहे. तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये इतिहास, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मराठी, हिंदी, इंग्रजी, भूगोल, शिक्षण, संवाद आणि पत्रकारिता, आणि जनसंपर्क या विषयांमध्ये एम.ए.चा समावेश आहे. सीडीओई (उऊज्ए) एमएमएस (चचड) आणि एमसीए (चउ-) अभ्यासक्रमांसोबतच, प्रगत लेखाशास्त्र आणि व्यवसाय व्यवस्थापनामध्ये एमकॉम (चउे), गणित, माहिती तंत्रज्ञान आणि संगणक विज्ञान या विषयांमध्ये एमएससी (चड्ल)



देखील प्रदान करते. याव्यतिरिक्त, विद्यार्थी पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन फायनान्शियल मॅनेजमेंट (झत्रऋळ्ळ) आणि डिप्लोमा इन स्कूल मॅनेजमेंट (ळ्ळच्) निवडू शकतात. उऊज्ए मार्फत दुहेरी पदवीचा पर्यायही उपलब्ध आहे एमएमएस आणि एमसीएचे प्रवेश सुरु

दोन वर्षांच्या एमएमएस आणि एमसीए अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया देखील सुरू झाली आहे. संबंधित ऑनलाइन प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शुल्क भरून प्रवेश निश्चित करण्यासाठी सीडीओईतर्फे पेमेंट लिंक पाठवल्या जात आहेत. ऑनलाइन प्रवेश परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी सीडीओईच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

ऑनलाईन सेवा मिळणार

उऊज्ए ने आपल्या ऑनलाइन अभ्यासक्रमांचाही विस्तार केला आहे. समाजशास्त्र विषयातील एम.ए. हा अभ्यासक्रम मागील शैक्षणिक वर्षापासून ऑनलाइन पद्धतीने चालवला जात आहे, तर शालेय व्यवस्थापनातील डिप्लोमा चालू शैक्षणिक वर्षापासून (पान ३ वर)